महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ५६ वा | दिनांक : २२/११/२०२४ | वार : शुक्रवार

## एकनाथ शिंदे शरद पवारांसोबत जाणार नाहीत; भाजपचा दावा

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षासोबत जाणार असल्याचा दावा भाजपने जोरकसपणे फेटाळून लावला आहे. एकनाथ शिंदे यांनी महाविकास आघाडीविरोधात निवडणूक लढवली आहे. त्यामुळे ते त्यांच्यासोबत जातील अशी कोणतीही शक्यता नाही. आमदार संजय शिरसाट यांनी यासंबंधी मांडलेली भूमिका त्यांच्या पक्षाची नाही, असे भाजपने म्हटले आहे.

विधानसभा निवडणुकीतील जनतेचा कौल मतदान यंत्रामध्ये बंद झाला आहे. आता राज्यात कुणाची सत्ता येणार? याविषयी विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. त्यातच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचे आमदार संजय शिरसाट यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या संभाव्य युतीचे संकेत दिलेत. यामुळे महायुतीच्या गोटात खळबळ माजली असताना भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी शिरसाट यांचा दावा धुडकावून लावला आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले की, संजय शिरसाट यांची भूमिका ही काही त्यांच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे असे मला वाटत नाही. त्यांच्या पक्षाची ही अधिकृत भूमिका असती तर मी त्यावर भाष्य केले असते. तथापि, मला असे काही घडेल असे अजिबात वाटत नाही.

एकनाथ शिंदे यांनी शरद पवार व महाविकास आघाडीच्या विरोधात निवडणुका लढवल्या आहेत. उद्धव ठाकरे यांच्याविरोधातही लढवल्या आहेत. त्यामुळे त्यांनी ज्या विचारातून महायुती किंवा भाजपसोबत युती केली, ते पाहता अशा प्रकारची तिळमात्रही गोष्ट होऊ शकत नाही असा माझा ठाम विश्वास आहे, असे प्रवीण दरेकर यांनी म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे संजय शिरसाट यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना एकनाथ शिंदे व शरद पवार यांच्यातील संभाव्य युतीवर भाष्य केले होते. पत्रकारांनी याविषयी त्यांना छेडले असता ते म्हणाले होते की, शरद पवार यांच्यासोबत जायचे की नाही? याचा निर्णय एकनाथ शिंदेच घेतली. आम्हाला त्यावर भाष्य करता येणार नाही. पण शिंदे साहेब नेहमीच योग्य दिशेने जात असतात असा आमचा आतापर्यंतचा अनुभव आहे. आम्ही त्यांचा शर्ट पकडून त्यांच्या मागे जाऊ. ते जो निर्णय घेतील तो आम्हाला मान्य असेल.

एकनाथ शिंदे यांच्या प्रत्येक निर्णयाला आम्ही त्याला बांधिल आहोत. ते जिकडे जातील तिकडे आम्ही त्यांच्यासोबत जाऊ. आम्ही त्यांच्यासोबत अत्यंत मजबुतीने राहू, असे ते म्हणाले होते.

## आमच्याशिवाय सत्ता स्थापन होऊच शकत नाही - बच्चू कडू



**अमरावती :** आम्ही सत्ता स्थापन करणार हे सुर्यप्रकाशा इतके सत्य आहे. सत्ता आम्ही स्थापण करु बाकीच्या लोकांना आम्हाला पाठिंबा द्यावा लागेल. कुणाची सत्ता येईल हे चित्र दिसत नाही अन् आमच्याशिवाय राज्यात सत्ता येईन् असे होऊच शकत नाही, विधानसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर प्रहारचे नेते बच्चू कडू यांनी हा दावा केला आहे.

बच्चू कडू म्हणाले की, भाजपने अतिशय खालच्या पातळीवर प्रचार केला. एकंदरित काँग्रेस आणि भाजप हे मतदारसंघात संभ्रमात होते. शेवटच्या क्षणी भाजपने काँग्रेस चालवा असे सांगितले तर कुठे काँग्रेसने भाजपला मतदान करा असे सांगितले. यात दोघेही एकमेंकाशी लढत राहिले. त्यांनी निवडणूक जिंकण्यासाठी नाही तर मला पराभूत करण्यासाठी लढवली. पण माझे मतदार पक्के आहेत त्यांनी मलाच मतदान केले.

बडनेरात दोन दिवसांपूर्वी बच्चू कडू म्हणाले की, धर्म हा निवडणूकीचा मुद्दा असू शकत नाही. केंद्र आणि राज्यात असताना धर्म जातीवर राजकारण करणे योग्य नाही. येथे जगण्यासाठी संघर्ष करणाऱ्या लोकांना 'बटेंगे तो कटेंगे' असे म्हणणे योग्य नाही. जनता आता जागरूक झाली आहे. मुद्द्यांपासून दूर ठेवण्याचे काम कोणी करत असेल, तर त्याला धडा शिकवा. आपल्याला व्यवस्था बदलण्याची गरज आहे. ही लढाई जिंकायची आहे. आमच्याशिवाय सरकार बनणारच नाही. स्वार्थासाठी राजकीय पक्ष जात-धर्माचा वापर करतात. या देशात डॉ. मनमोहन सिंह हे पंतप्रधान आणि डॉ. एपीजे अब्दूल कलाम हे राष्ट्रपती होते, तेव्हा हिंदू अडचणीत नव्हता. खरे तर हिंदू खतरे मे है, मुसलमान खतरे मे है, ही भाषा राजकारणी लोकांची आहे. पण, आत नेतेच खतरे मे आले आहेत.

## अजित पवारांना कोर्टाकडून समन्स न्यायालयात हजर राहण्याचे निर्देश



**बारामती :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांना बारामती कोर्टाकडून समन्स बजावण्यात आला आहे. अजित पवारांनी उमेदवाराला मतदान केले नाही तर गावचे पाणी बंद करू, असे विधान २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत केले होते. या प्रकरणी हे समन्स बजावण्यात आले आहे. माजी आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे यांनी यासंदर्भात याचिका दाखल केली होती.

माजी आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे हे २०१४ च्या निवडणुकीत आम आदमी पक्षाचे उमेदवार होते. त्यावेळी देखील खोपडे यांनी यासंदर्भात तक्रार दाखल केली होती. त्यानंतर आता बारामती कोर्टाने अजित पवारांना समन्स बजावले असून कोर्टात हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अजित पवार यांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकांसाठी प्रचार करताना मतदारसंघातील गावकऱ्यांना दमदाटी केली असल्याची माहिती आहे. बारामती येथील मासाळवाडी या गावात २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारार्थ दौरा सुरू होता. या गावात पाणीटंचाईचा भीषण प्रश्न त्यावेळी होता. तेव्हा प्रचार सभेत बोलताना अजित पवारांनी सुप्रिया सुळे यांना मतदान केले नाही तर गावाचे पाणी बंद करू. तुमचा दोन महिन्यात पाण्याचा प्रश्न सोडवतो, आम्हालाच मतदान करा, अशी दमदाटी केली असल्याचा त्यांच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे. याच संदर्भात सुरेश खोपडे यांनी याचिका दाखल केली होती.

सुरेश खोपडे यांनी अजित पवारांच्या या विधानाच्या विरोधात याचिका दाखल केल्यानंतर आता बारामती कोर्टाने अजित पवारांना हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीची धामधूम संपल्यावर अजित पवार कोर्टाने दिलेल्या नियोजित तारखेला हजर राहणार की नाही याकडे देखील सर्वांचे लक्ष असणार आहे. विशेष म्हणजे सुप्रिया सुळे यांच्याससाठी अजित पवारांनी हे विधान केले होते, मात्र यंदाच्या निवडणुकीत मात्र दोघेही एकमेकांच्या विरोधात पाहायला मिळाले आहे.

## अदानीला अटक करण्याची राहुल गांधींची मागणी योग्यच - नाना पटोले



**मुंबई :** उद्योगपती गौतम अदानी यांनी कंत्राटे मिळवण्यासाठी २ हजार कोटी रुपयांची लाच दिल्याच्या आरोपावरून अमेरिकेच्या कोर्टाने अटक वॉरंट काढले आहे. ही केंद्रातील सरकारसाठी लाजिरवाणी घटना आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मदतीने गौतम अदानींनी देश विदेशात मोठ्या प्रमाणात कंत्राटे मिळवून देशाला लुटले आहे. भ्रष्टाचाराचे आरोप करून कोणतीही चौकशी न करता मोदी सरकारने मुख्यमंत्र्यांना जेलमध्ये टाकले पण अमेरिकेच्या तपास यंत्रणाच्या तपासात अंबानींने मोठ्या प्रमाणात लाच देऊन कंत्राटे मिळवल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही भ्रष्ट अदानीला अटक का केली जात नाही? भारत सरकारने चौकशी करून गौतम अदानीला जेलमध्ये टाकावे ही लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची मागणी रास्तच आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सहकार्याने व सरकारी यंत्रणांच्या मदतीने अदानी देशाला लुटत आहे. विमानतळ, बंदरे, उर्जानिर्मितीसह सर्वच क्षेत्रात अदानीची मक्तेदारी सुरु असून त्याला जबाबदार पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच आहेत. अदानीला देश विदेशातील कंत्राटे देण्यासाठी पंतप्रधान मोदीच मदत करत आहेत हे उघड आहे.

धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली स्थानिकांना बेघर करण्याचा डाव आखून लाखो कोटी रुपयांची मुंबईतील जमीन अदानीच्या घशात घातलेली आहे. मुंबईचे विमानतळही अदानीलाच दिले आहे. यापाठीमागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा भक्कम पाठिंबा आहे. विरोधी पक्षनेते या नात्याने राहुल गांधी यांनी अदानीवर कारवाई करण्याची केलेली मागणी रास्तच असून अमेरिका जर गौतम अदानीच्या भ्रष्टाचाराबद्दल अटक वॉरंट काढू शकते तर भारत सरकार का कारवाई करु शकत नाही? भारत सरकारने कारवाई करून देशाला लुटणाऱ्यांना जेलमध्ये टाकले पाहिजे असेही नाना पटोले म्हणाले.

या संदर्भात पटोले यांनी एका पोस्टच्या माध्यमातूनही अदानी आणि मोदींवर टीका केली आहे. आपल्या पोस्टमध्ये पटोले यांनी लिहिले की, 'पंतप्रधानांचे घनिष्ठ मित्र गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेमध्ये फसवणुकीचा खटला आणि अटक वॉरंट जारी होणे ही भारताची बदनामी नाही का? अदानींच्या भारतातील सर्व संशयास्पद व्यवहारांबाबत मा. राहुल गांधीजी आणि काँग्रेस पक्षाने संसदेत वारंवार चौकशीची मागणी केली आहे. परंतु सामान्य जनता आणि गुंतवणूकदारांना कवडी मोलाचीही किंमत न देता देशाला लुटण्याचे काम सुरू ठेवले आहे. सेबी प्रमुख माधवी बूच त्यांना वाचविण्याचे काम करत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताची नाचक्की झालेली असताना केंद्र सरकारने कडक पावले उचलून अदानी समूहाने केलेल्या ₹2000 कोटींच्या घोटाळ्याची चौकशी करावी आणि ताबडतोब गौतम अदानी यांना अटक करावी, अशी आमची मागणी आहे.'

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४


## शिक्षक पतिच्या निधनानंतर पत्नीने विषारी औषध पिऊन संपवली जिवनयात्रा





**शिरूर कासार :** शिरूर तालुक्यातील खामकर वाडी येथील जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत असलेल्या शिक्षकाचा पहाटे हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना घडली होती. घटनेच्या काही तासातच त्यांच्या पत्नीने विषारी औषध प्राशन करून पति पाठोपाठ आपला जिवन प्रवास थांबवला. या घटनेनंतर तालुक्यात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

खामकरवाडी येथील शिक्षक कन्हैया लाल खामकर वय ५२ वर्ष हे तालुक्यातील आर्वी केंद्रांतर्गत असलेल्या शिंदे वस्ती शाळेवर शिक्षक म्हणून कार्य करीत होते. त्यांना दि. २१ नोव्हेंबर वार गुरुवार रोजी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास हृदयविकाराचा झटका आला व यामध्ये त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूचा शोक कुटुंब व्यक्त करीत असतानाच त्यांच्या पत्नी राहीबाई कन्हैयालाल खामकर वय ४५ वर्ष यांनी पुढील काही वेळातच विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. त्यांचा मृतदेह शिरूर येथील शासकीय रुग्णालयात शिवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आला आहे.





२४० उमरगा- लोहारा विधानसभा मतदारसंघातील मुरुम शहरातील प्रतिभा निकेतन शाळेतील मतदान क्रेंद्रावर मतदान करताना श्वेता बापुराव पाटील, सौ. संपदा शरण पाटील, उमरगा जनता सहकारी बँकेचे चेअरमन शरणभैय्या बसवराज पाटील, सुजित शेळके, गौस शेख व इतर (छायाचित्र व वार्तांकन प्रा. सुधीर पंचगल्ले)







## मतदान केंद्रावरील तोडफोड प्रकरणी ४० जणांवर गंभीर गुन्हे दाखल:



**बीड :** विधानसभा निवडणुकीत मतदानाच्या दिवशी परळी मतदारसंघातील घाटनांदूर (ता. अंबाजोगाई) येथे मतदान केंद्रावर तोडफोडीची घटना घडली होती. याप्रकरणी जवळपास ४० जणांवर अंबाजोगाई ग्रामीण ठाण्यात अतिशय गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले.

प्रत्येक निवडणुकीत परळी मतदार संघ कुठल्या ना कुठल्या कारणाने चर्चेत असतो. यंदाच्या विधानसभा निवडणुकीतही परळी मतदार संघात राडा झाला. महाविकास आघाडीचे नेते ॲड. माधव जाधव यांना कन्हेरवाडी येथे मारहाण करण्यात आली. व्हिडीओ व्हायरल होताच या मारहाणीचे पडसाद संपूर्ण मतदार संघात उमटले. घाटनांदूर येथील पोलिसचौकीतील पोलिसशिपाई नानासाहेब धुमाळ यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बुधवारी (दि.२०) दुपारी १.३० वाजताच्या सुमारास जि. प. प्राथमिक शाळा, जि.प. कन्या शाळा, सोमेश्वर विद्यालयातील मतदान केंद्रात अचानक ५० ते ६० लोक एमएच ०६ एझेड ४२०८, एमएच १४ एवाय ३५ आणि एमएच ४४ एस ७७१६ या वाहनातून घातक हत्यारे, लाकडी दंडुके घेऊन आले. ॲड. माधव जाधव यांना धक्काबुक्की झाल्याच्या कारणावरून त्यांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी पोलीस, होमगार्ड आणि केंद्राध्यक्ष यांना घातक हत्यारे आणि दंडुक्यांनी जीवे मारण्याचा प्रयत्न केला. या हल्ल्यात पोलिस कर्मचारी, केंद्राध्यक्ष जखमी झाले. त्यांनतर आरोपींनी ईव्हीएम मशीन आदळून नुकसान केले. सदर फिर्यादीवरून अक्षय कमलाकर मोरे, सुरज अशोक निंबाळकर (दोन्ही रा. मोरेवाडी), शंभूराजे संजय देशमुख (मार्केगाव), यशोदीप कल्याण किर्दंत, ओम प्रवीण किर्दंत, वैभव रमेश किर्दंत (सर्व रा. सातेफळ), अभिजीत कल्याण देशमुख (नांदडी), सिद्धेश्वर जाधव, सुनील देशमुख, वसंत मारोती करजाळकर बलांडे, नानासाहेब पूसकर देशमुख, विशाल जाधव, गणेश जाधव, विजय जाधव, अजय जाधव, संजय अनंत जाधव, गोट्या जाधव, उमाकांत जाधव (सर्व रा. घाटनांदूर) व इतर १५ ते २० जण असे एकूण जवळपास ४० जणांवर कलम बीएनएस १०९, ११८(१), १३२, १८९(२), १९१(२), १९१(३), १९०, ३२४(४), ३२४(५), मालमत्ता विरुपण प्रतिबंधक अधिनियम, लोकप्रतिनिधीत्व अधिनियमान्वये अंबाजोगाई ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले.

दरम्यान, गुन्हे दाखल होताच पोलिसांनी एका अल्पवयीन सह सात आरोपींना ताब्यात घेतले. इतर आरोपींच्या शोधासाठी पोलिसांची पथके रवाना झाली आहेत. पुढील तपास एपीआय राजेंद्र घुगे करत आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार २२ नोव्हेंबर २०२४


## हरियाणात पुष्पा-२ वर बहिष्काराची धमकी



**हिसार :** दाक्षिणात्य चित्रपट पुष्पा-२ विरोधात हरियाणाच्या हिस्सार जिल्ह्यातील एका गावात पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीत धार्मिक भावना दुखावल्याचे म्हटले आहे. याप्रकरणी पोलिसांनी अद्याप कोणताही गुन्हा दाखल केलेला नाही.

या प्रकरणाचे तपास अधिकारी गौतम कुमार सांगतात की, नुकतीच तक्रार आली आहे. वरिष्ठांशी चर्चा करूनच पुढील कार्यवाही केली जाईल. हिसार येथील जुगलान येथील रहिवासी कुलदीप कुमार यांनी ही तक्रार दाखल केली आहे.

पैशासाठी एका विशिष्ट धर्माचा जाणीवपूर्वक अपमान करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे कुलदीपने म्हटले आहे. हा चित्रपट असाच सुरू राहिला तर तो हिसार (हरियाणा) येथे प्रदर्शित होऊ देणार नाही, असे कुलदीपने सांगितले.

'पुष्पा २ द रुल' या चित्रपटाचा ट्रेलर रविवारी, १७ नोव्हेंबर रोजी पाटणा येथील गांधी मैदानावर लाँच करण्यात आला. हा चित्रपट ५ डिसेंबरला प्रदर्शित होणार आहे, या कार्यक्रमाला अभिनेता अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना यांनीही हजेरी लावली होती. मी पाहिले की ट्रेलरमध्ये मां कालीसारखे चित्र दाखवले आहे.

अभिनेता अल्लू अर्जुन अर्धनारीश्वर अवतारात दिसला, त्यामुळे सनातन धर्माशी संबंधित लोक आणि माझ्या धर्माच्या श्रद्धा दुखावल्या आहेत. मी चित्रपटासोबतच सर्व कलाकारांचा आदर करतो, पण काही कलाकार असे आहेत जे पैशासाठी एका विशिष्ट धर्माच्या श्रद्धा दुखावण्याचा प्रयत्न करत आहेत.

जर हा सीन चित्रपटातून हटवला नाही तर 'पुष्पा २ द रुल' हिसार, हरियाणात प्रदर्शित होऊ देणार नाही. तक्रारीत अभिनेता अल्लू अर्जुनचा ईमेल आयडी आणि कायमचा पत्ता देण्यात आला आहे. दिग्दर्शक आणि कलाकारांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी कुलदीपने पोलिस प्रशासनाकडे केली आहे.

## भाजपचे मंत्री अतुल सावे यांनी पैसे वाटले इम्तियाज जलील यांचा आरोप



**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय जनता पक्षाचे मंत्री आणि औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघातील उमेदवार अतुल सावे यांनी निवडणुकीत पैसे वाटल्याचा आरोप एमआयएमचे नेते तथा माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केला आहे. अतुल सावे यांच्या विरोधात झालेली इम्तियाज जलील हे देखील औरंगाबाद पूर्व विधानसभा मतदारसंघातील एमआयएमचे उमेदवार आहेत. या बाबतचे काही व्हिडिओ देखील त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये दाखवले. तसेच महाराष्ट्र निवडणूक आयोगाला यासंबंधीचे व्हिडिओ आपण पाठवले असल्याची माहिती देखील त्यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

या संदर्भातील त्याच इम्तियाज जलील यांनी पत्रकार परिषदेमध्ये व्हिडिओ दाखवत अतुल सावे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. जवाहर नगर पोलिस ठाण्याजवळ असलेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्याच्या कार्यालयात मुस्लिम महिलांना आणून पैसे वाटप करण्यात आले असल्याचे जलील यांनी म्हटले आहे. या संदर्भातला एक व्हिडिओ देखील त्यांनी दाखवला. या ठिकाणी मुस्लिम महिलांना पैसे देऊन त्यांच्या बोटांना शाई लावली जात होती, असा आरोप जलील यांनी केला आहे. यात त्यांनी अॅड. अरविंद डोणगावकर यांच्यावर आरोप केले आहेत. डोणगावकर हे भाजपचे पदाधिकारी असल्याचा दावा देखील त्यांनी केला आहे.

दुसरीकडे मुस्लिम महिला मोठ्या प्रमाणात आणून बोगस मतदान करून घेण्यात आले असल्याचा आरोप देखील इम्तियाज जलील यांनी केला आहे. याबाबत त्यांनी दुसरा एक व्हिडिओ देखील पत्रकारांना दाखवला. यामध्ये भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी जालिंदर शेंडगे यांनी बोगस महिला मतदानासाठी आणल्या होत्या, असा आरोप जलील यांनी केला आहे. आंबेडकर नगर येथील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला असून तेथील नागरिकांनीच मला या बाबतची माहिती दिली असल्याचा दावा त्यांनी केला आहे.

## आर्थिक उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर होणार - एकनाथ खडसे



**जळगाव :** महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठीचे मतदान नुकतेच पार पडले आहे. तसेच आता २३ तारखेला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाणार आहे. या पार्श्वभूमीवर आता सरकार कोणाचे येणार यावर तर्कवितर्क लावले जात आहेत. त्यात महायुतीकडून सरकार आपलेच होणार असल्याचा दावा केला जात आहे, तर महाविकास आघाडीने देखील सरकार स्थापनेचा दावा केला आहे. यात आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे विधान परिषदेचे आमदार एकनाथ खडसे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

राज्यातील आर्थिक उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर झाला असल्याचे एकनाथ खडसे म्हणाले आहेत. ज्यांनी ज्यांनी अधिकाधिक आर्थिक व्यवहार केला त्यांना चांगला प्रतिसाद मिळाल्याचे दिसले. काही ठिकाणी आर्थिक व्यवहार झालेही असतील पण लोकांनी ते नाकारले. पण साधारणतः आर्थिक उलाढाल जी झाली, त्या उलाढालीचा परिणाम निवडणुकीवर दिसेल, असे मत एकनाथ खडसे यांनी व्यक्त केले आहे.

महाविकास आघाडी किंवा महायुती दोघांनाही या ठिकाणी जर स्पष्ट बहुमत जर नाही आले तर अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापनेचा दावा होऊ शकतो. कोणाचेही सरकार आले तरी ते स्थिर राहील की नाही याची खात्री देता येत नाही, असेही एकनाथ खडसे म्हणाले आहेत.

दरम्यान, एकनाथ खडसे यांच्या कन्या रोहिणी खडसे यांना मुक्ताईनगर विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटकडून उमेदवारी देण्यात आली होती. त्यांच्या प्रचारार्थ एकनाथ खडसे यांनी मतदारसंघात प्रचार देखील केला. तसेच महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा देखील त्यांनी प्रचार केला होता. आता तब्येतीचे कारण देत दगदग सहन होत नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. पुढील निवडणूक मी पाहणार की नाही, ते परमेश्वर ठरवेल, असेही एकनाथ खडसे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले होते. त्यामुळे एकनाथ खडसे राजकीय संन्यास घेण्याच्या तयारीत असल्याची चर्चा सुरू आहे.

## कवी ना. वी. पठारे यांचे वृद्धापकाळाने निधन



**वैजापूर :** तालुक्यातील बोरसर येथील रहिवासी व सेवानिवृत्त शिक्षक नामदेव विठ्ठल पठारे यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले.

नामदेव पठारे सर शिव, फुले, शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर चळवळीतील अग्रगण्य कार्यकर्ते होते. आपल्या सामाजिक कार्यासोबतच कथा, कविता, गीत, गायन, अभिनय, पोवाडा, भारूड, नाटक, चित्रकला या साहित्याच्या वेगवेगळ्या प्रकारातून सामाजिक प्रश्नांवर सडेतोड व मार्मिक भाष्यही केले आहे. काही काळ त्यांनी पत्रकारितेतही मुशाफिरी केली.

त्यांच्या पश्चात पत्नी, पाच मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. नालेगाव येथील शिक्षक प्रमोद पठारे यांचे ते वडील होत.


मराठी टायपिंगसाठी
डी.टी.पी.ऑपरेटर मुले पाहिजे
------: संपर्क :------
साहिल कॉम्प्युटर्स
विद्यापीठ गेटजवळ, मोनूज हॉटेल, जयसिंगपूरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद)
मो. 8956362639 /8087880274